वर्ष - ५ | अंक - १५ | पाने ४ | किंमत - ४ रुपये | www.Bharatsangram.com | EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE | Bharatsangram@gmail.com | आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र. MAHMAR/2020/79677

दैनिक वाशिम, शुक्रवार ४ डिसेंबर २०२५ सत्याचा बुलंद आवाज

# भारत संग्राम

TRENDING NEWS

**चित्रपटाच्या प्रमोशनसाठी पेड PR ट्रेंडवर यामी भडकली:धुरंधरच्या रिलीजपूर्वी पोस्ट लिहून राग व्यक्त केला, हृतिक रोशन अभिनेत्रीच्या**

पान 3 वर



## थोडक्यात

### अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू

**यवतमाळ :** नागपूर-तुळजापूर महामार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी रात्री घडली. तुकाराम भीमराव कुंभेकर असे मृत व्यक्तीचे नाव आहे. फिर्यादी रामेश्वर भिमराव कुभंकार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, तुकाराम हे कामाला जातो म्हणून घरातून निघाले होते. मात्र, गुरू लक्ष्मी टेक्स्टाईल ग्राम रोडवर अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जागेवरून विक्रेत्याला मारहाण

**यवतमाळ :** आठवडी बाजारात दुकान लावण्याच्या कारणावरून भाजी विक्रेत्याला लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली. फिर्यादी विक्की लक्ष्मण मसराम आणि संशयित आरोपी गौरव देवानंद नानणे हे दोघे भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. गौरव याने "ही जागा माझी आहे" असे म्हणत विक्की यांच्याशी वाद घातला. त्यानंतर लोखंडी रॉडने विक्की यांच्या हाताच्या अंगठ्यावर मारून जखमी केले. अवधूतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### दुचाकीच्या धडकेत जखमी

**कळंब :** भरधाव दुचाकीने धडक दिल्याने एक जण जखमी झाल्याची घटना कळंब ते बाभुळगाव रोडवर घडली. फिर्यादी आदेश संतोष ठाकरे आणि त्यांचे भाऊ चेतन भारत हे शेतात जात होते. त्यावेळी संशयित आरोपी गजानन धनोडी गाडेकर याने आपल्या ताब्यातील विनाक्रमांकाच्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात आदेश जखमी झाले आहेत. याप्रकरणी कळंब पोलिस ठाण्यात गजानन याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तरुणावर चाकूने वार

**पुसद :** जुन्या वादातून तीन जणांनी एका तरुणाला मारहाण करून चाकूने वार केल्याची घटना श्रीरामपूर येथे घडली. फिर्यादी प्रदयूम अरुण राठोड हे जगदंबा मंदिरासमोर शेकोटी पेटवून बसले होते. त्यावेळी संशयित आरोपी तन्मय पवार आणि दोन अनोळखी व्यक्ती तेथे आले. "तू गावी जाऊन काय सांगितले," असा जाब विचारत त्यांनी प्रद्युम यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि डोक्यावर चाकूने वार करून जखमी केले. वसंतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

# भारतात कायद्याचे राज्य की भाजपचे?

## एकाच प्रकारच्या कार्यक्रमासाठी आमच्यावर गुन्हा अन् भाजप नेत्यांना मोकळे रान; काँग्रेसचा आरोप

**भारत संग्राम | प्रतिनिधी**




**मुंबई :** मुंबई पोलिसांनी एकाच प्रकारच्या कार्यक्रमासाठी काँग्रेसच्या नेत्यांवर गुन्हा नोंदवून भाजपच्या पदाधिकाऱ्यांना मोकळे रान दिल्याचा प्रकार उजेडात आला आहे. या प्रकरणी संतप्त झालेल्या काँग्रेसने भारतात कायद्याचे राज्य आहे की, भाजपचे? असा सवाल उपस्थित केला आहे.

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे रान पेटले आहे. सर्वच राजकीय पक्ष आपापली ताकद वाढवून मतदारांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने भाजप व मुंबई पोलिसांवर वरील टीका केली आहे. भाजपाने कोणतीही परवानगी न घेता आपल्या जाहिरनाम्याचा कार्यक्रम मरीन ड्राईव्ह येथे केला तर त्यांच्यावर पोलिसांनी कोणताही गुन्हा दाखल केला नाही. मुंबई काँग्रेसने गेल्या रविवारी तीथेच जाहिरनामा प्रकाशित केला तर आमच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे पोलिस प्रशासनाला आम्ही हे लक्षात आणून दिले असता तुम्ही कोणतेही माईक वापरु नका, स्टँडी वापरा. जर भाजपाच्याच प्रमाणे कार्यक्रम केलात तर हरकत नाही असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले होते. पोलिसांनी तीथे सहकार्य ही केले. पण वरुन काय सूत्रे हलली आणि गुन्हे दाखल करण्यात आले. याविषयी पोलिसांना विचारणा केली तर तुम्हाला माहिति आहे ना काय चाललंय ते? असा हतबल जवाब मिळाला. आमचा प्रश्न आहे की भारतात कायद्याचे राज्य आहे का भाजपाचे? सत्ताधाऱ्यांना वेगळा न्याय आणि विरोधकांना वेगळा न्याय कसा? न्यायालयात आम्ही ही लढाई लढू पण जनतेने देशात हुकुमशाही सुरू आहे हे ओळखावे. जाहीर निषेध, असे त्यांनी म्हटले आहे. सावंत यांनी यावेळी ऑरेंज गेट - मरीन ड्राईव्ह टनेल सारखा महत्त्वाचा प्रकल्प एल अँड टी कंपनीला देण्यावरूनही सरकारवर निशाणा साधला आहे. दिल्लीतील 1.3 किमीचा प्रगती मैदान टनेलचे काम L&T या कंपनीला देण्यात आले होते. सदर कामाचे जून 2022 ला उद्घाटन करण्यात आले आणि काही महिन्यांतच पाण्याची गळती, वॉटर-लॉगिंग, निकृष्ट ड्रेनेज, मोठे काँक्रिट क्रॅक्स, फॉल्टी कर्बस्टोन्स, हरवलेले ड्रेन्स असे प्रचंड गंभीर दोष उघड झाले. दिल्ली PWD ने हे "क्षुल्लक नाही, तर गंभीर तांत्रिक व डिझाइन त्रुटी" असल्याचं जाहीर केलं. टनेल अनेकदा पावसात बंदही करावा लागत होता. यावर 2024 मध्ये L&T ला ₹500 कोटींचा दंड व कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आणि निष्काळजीपणाबद्दल PWDच्या अधिकाऱ्यांनाही नोटिसा दिल्या गेल्या. DMRC–PWD–CPWDच्या तज्ज्ञ समितीला दुरुस्ती तपासणीसाठी नेमावं लागलं. प्रकल्पाचा शेवटचा टप्पा दोन वर्षे ठप्प राहिल्यानंतर अजूनही पुन्हा काम सुरू आहे. आणि अशा कंपनीला महा-युती सरकार ऑरेंज गेट–मरीन ड्राईव्ह टनेल सारखा प्रकल्प देत आहे. मुख्यमंत्री सदर प्रकल्पाला ऐतिहासिक म्हणत आहेत. मुंबईकरांच्या जीवाशी इतका मोठा धोका का पत्करला जात आहे? याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. तंत्रज्ञानात या कंपनीने प्रगती केली आहे असा निर्वाळा देत जबाबदारी मुख्यमंत्री घेणार का? याचे उत्तर द्यावे, असे सचिन सावंत यांनी म्हटले आहे.

## आठ वर्षे एकत्र राहणाऱ्या तरुणाचे लग्न ठरले, तृतीयपंथीची आत्महत्या:प्रियकर सुजित जमादार हळदीच्या दिवशीच कोठडीत

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**सोलापूर :** आठ वर्षांपासून एकत्र राहणाऱ्या तरुणाचे दुसऱ्या मुलीशी लग्न ठरल्याने तृतीयपंथीने आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी घडली. प्रियकर तरुणाचा गुरुवारी हळदी कार्यक्रम होता. पोलिसांनी अटक करून कोठडीत रवानगी केली. प्रकाश व्यंकप्पा कोळी ऊर्फ स्विटी असे त्या तृतीयपंथीचे नाव आहे. त्याचे सुजित जमादार या तरुणाशी प्रेमसंबंध होते.

गेल्या ८ वर्षांपासून बाळ्यातील एका घरात भाड्याने राहात होते. सुजित शुक्रवारी बोहल्यावर चढणार होता. गुरुवारी हळदीचा कार्यक्रम असतानाच तृतीयपंथी कोळीने घरात ओढणीने गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. आत्महत्या करण्यापूर्वी सोशल मीडियावर तृतीयपंथी प्रकाश यांनी म्हटले, की सुजितने धोका दिला. माझ्याशी लग्न करून पुन्हा दुसरे लग्न करतो आहे. त्यामुळेच आत्महत्या करत आहे. सुजित हा एमआर (वैद्यकीय प्रतिनिधी) आहे. तृतीयपंथी प्रकाश हा आठवी शिकलेला होता. सुजितसोबत फिरत असताना दोघांचे प्रेम जुळले. बाळे येथील भाड्याच्या घरात राहत असताना तो दुसरा लग्न करतो, असे म्हणत होता. त्याला मूल हवे होते. त्यामुळेच त्याने लग्न करण्यास ठरवले. त्यास प्रकाश विरोध करत होता. दोघांमध्ये वाद सुरू झाला. प्रकाश भावुक झाला होता. त्याने बुधवारी बहिणीकडे जाऊन सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर गुरुवारी सकाळी आत्महत्येचा प्रकार उघडकीस आला. फौजदारी चावडी पोलिसांत त्याची नोंद झाली. प्रकाश सोशल मीडियावर रिल्स करत होता. नृत्याची आवड असल्याने हिंदी, मराठी गाण्यांवर रिल्स बनवत होता. सोशल मीडियावर सक्रिय होता. दरम्यानच्या काळात ते नाशिकला गेले होते. तेथून सुजितला बोलावला होता. परंतु सुजित काही गेला नाही. याच काळात सुजितचे एका मुलीशी लग्न ठरले. त्यामुळे नैराश्यात गेलेल्या प्रकाशने आत्महत्येपूर्वी त्याच्या मोबाइलवर स्टेटस ठेवून त्यावर म्हटले की, माझ्या आत्महत्येस सुजित हाच जबाबदार आहे. माझ्यावर गेल्या १२ वर्षांपासून प्रेम करत होता. ८ वर्षांपासून एकत्र होतो. या काळात त्याने मला जोगतीपासून आणि माझ्या जमातीपासून दूर ठेवले. मानसिक छळ केला. त्यामुळे आत्महत्या करत आहे. माझ्या पश्चात माझ्या कुटुंबीयांना त्रास देऊ नये, हीच अपेक्षा.

## शालार्थ आयडी प्रकरण:एसआयटीला 3 महिन्यांची दिली मुदतवाढ, मंत्री दादा भुसे

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**मुंबई :** राज्यभरात सध्या शिक्षण क्षेत्रातील शालार्थ आयडी घोटाळा गाजतो आहे. यात अनेक मोठे अधिकारी चौकशीसाठी अटकेत आहेत. या घोटाळ्याची व्याप्ती शोधण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली. या समितीला आता तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. कोल्हापूरमध्ये टीईटी पेपरफुटी प्रकरणी कडक कारवाई केली असून पुढील तपास सुरू असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

शहरात आयडॉल शिक्षक कार्यशाळेचे आयोजन तापडिया नाट्यमंदिर येथे गुरुवार 4 डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या वेळी माध्यमांशी चर्चा करताना शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे व राज्यमंत्री पंकज भोयर यांनी ही माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे. त्यांना तंत्रज्ञानाचे चांगले आणि वाईट परिणाम देखील शिकवणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिक्षकांनी शाळांमध्ये करावा.त्यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात येणार असल्याचेही भोयर यांनी यावेळी माहिती देताना सांगितले. दरम्यान, मंत्री दादा भुसे यांनी शालार्थ आयडी चौकशीसाठी एसआयटीला 3 महिन्यांची मुदतवाढ दिल्याची माहिती दिली. सर्व शाळांमध्ये प्रार्थनेच्या वेळी राष्ट्रगीत गायले जाते. आता यापुढे सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राज्यगीत देखील गायले जावे, असेही शिक्षकांना भुसे यांनी सूचित केले. पीएमश्रीप्रमाणे राज्यात सीएमश्री आदर्श शाळा स्थापन केल्या जातील. यात पाच हजार शाळांचा समावेश असेल, अशी घोषणायापूर्वीच करण्यात आली होती.

## दिवाळीपर्यंत चांदी 2 लाखांच्या आसपास पोहोचण्याचा तज्ज्ञांचा अंदाज

**भारत संग्राम | प्रतिनिधी**




**मुंबई :** अवघ्या महिनाभरात पुन्हा एकदा चांदीच्या दरांनी उसळी मारली असून बुधवारी (दि. 3) एक किलो चांदीचा दर जीएसटीसह एक लाख 82 हजारावर पोहोचला. 28 ऑक्टोबरला हा दर एक लाख 45 हजारावर होता. डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत बुधवारी 90.30 रुपये अशा नव्या पातळीवर गेल्याने परिणामी आयातीवर आधारित असल्यामुळे चांदीच्या किमतीवर याचा थेट परिणाम होऊन दरवाढ होत आहे. दिवाळीपर्यंत चांदी दोन लाखांच्या आसपास पोहोचण्याची शक्यता या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. 11 महिन्यांत गुंतवणूकदारांना चांदीवर प्रति किलो 88000 रुपये परतावा मिळाला आहे.

चांदीच्या पारंपरिक मागणीसोबतच औद्योगिक वापरही वाढला आहे. सोलर पॅनल, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, बॅटरी आणि वैद्यकीय उपकरणांमध्ये चांदीचा वापर वाढत असल्याने पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त रहात आहे. भारतातही सणासुदीत खरेदी वाढते. या सर्व कारणांचा एकत्रित परिणाम म्हणजे चांदीचे दर सातत्याने उंचावत आहे. सततच्या दरवाढीमुळे चांदीत गुंतवणूक करण्याकडेही कल वाढला आहे. याचमुळे गुंतवणुकीचा पर्याय आता चांदी बनली आहे. चांदीत गुंतवणुकीला तरुणांकडून अधिक पसंती असल्याचे सराफी व्यावसायिक सांगतात. रुपया कमजोर झाला की, परकीय चलनात किंमत जास्त मोजावी लागते आणि त्यामुळे चांदीचा भाव देशांतर्गत बाजारात झपाट्याने वाढत आहे. जागतिक पातळीवरील राजकीय घडामोडी, औद्योगिक क्षेत्रातून चांदीची वाढती मागणी या सर्व कारणांचा एकत्रित परिणाम म्हणून चांदीची दिशा सध्या वरच्या दिशेने आहे. डिसेंबर संपेपर्यंत चांदी दोन लाख रुपये प्रति किलोच्या आसपास पोहोचण्याचा अंदाज आहे.

## आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी महाराष्ट्र शासनाचा महासंकल्प


**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी शासनाने विशेष समिती स्थापन करण्याचा आदेश जारी केला असून, या समितीत विविध उच्चपदस्थ राजकीय नेते, शासकीय अधिकाऱ्यांबरोबर इतिहासतज्ज्ञांचा समावेश आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाने आग्र्यातील त्या जागेचे अधिग्रहण करून, स्मारकासोबत संग्रहालय व माहिती केंद्रही उभारण्याची तयारी सुरू केली आहे.

शासनाच्या जारी झालेल्या शासन निर्णयानुसार आग्र्यामध्ये तो परिसर, जिथे छत्रपती शिवाजी महाराज यांना नजरकैद ठेवण्यात आले होते, तो महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित केला जाईल. त्याठिकाणी एक प्रतिष्ठापूर्ण स्मारक निर्माण करण्यात येईल, व निधीसाठी आवश्यक तरतूद आगामी अर्थसंकल्पात करण्याची हमी आहे. या प्रकल्पासाठी नोडल विभाग म्हणून पर्यटन विभाग निवडण्यात आला असून, जमीन अधिग्रहण, निधी उपलब्धता, आणि विकास कामांची जबाबदारी हे विभाग करणार आहेत. स्मारकाबरोबरच, इतिहासाचे जतन व प्रदर्शन करण्यासाठी संग्रहालय, माहितीपट/दृश्य-श्राव्य कार्यक्रम असे विविध उपक्रमही या प्रकल्पाचा भाग असणार आहेत. नव्याने स्थापन झालेल्या समितीचे अध्यक्ष म्हणून पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांची निवड करण्यात आली आहे. सदस्यांमध्ये राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पर्यटन विभागाचे मुख्य सचिव, व्यवस्थापकीय संचालक, तसेच पर्यटन संचालनालय मुंबई, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय मुंबईचे अधिकारी आहेत. त्याचबरोबर इतिहासतज्ज्ञ म्हणून विक्रमसिंह मोहिते, डॉ. केदार फाळके, ॲड. मारुती आबा गोळे, सुधीर श्रीरंग थोरात यांचा समावेश आहे. या समितीचे सचिव म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबईचे महाव्यवस्थापक नियुक्त करण्यात आले आहेत. या समितीचे प्राथमिक काम म्हणजे, सर्वप्रथम त्या ऐतिहासिक जागेचे नकाशा, जमीन, व वास्तूंची पाहणी करणे व पुरावे तपासणे; नंतर स्मारकाची संकल्पना (थीम), डिझाइन, प्रकल्प रूपरेषा तयार करून ती शिखर समिती समोर सादर करणे. त्यानंतर, निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण, बांधकाम व संग्रहालयाच्या रचना सुरू होणार आहेत.

## देवेंद्र फडणवीस सरकारच्या जर्मनीतील नोकऱ्या हवेतच:राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे दहा हजार विद्यार्थ्यांची सुवर्णसंधी धुळीस

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**मुंबई :** महाराष्ट्रात बेरोजगारीचे संकट दिवसेंदिवस वाढत असताना, कुशल युवकांना परदेशात नोकरी मिळण्याच्या संधी देखील राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे हातातून निसटत आहेत, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. जर्मनी सरकार आणि महाराष्ट्रातील विविध विभागांमध्ये 2024 मध्ये झालेल्या करारानुसार राज्यातील कौशल्याधारित कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर परदेशात नोकऱ्या उपलब्ध करून देण्याची योजना जाहीर झाली होती. शासनाने अधिकृतरीत्या निर्णय घेत दहा हजार विद्यार्थ्यांना जर्मनीमध्ये रोजगार देण्यास मंजुरी दिली होती. पण वर्ष उलटूनही एकाही विद्यार्थ्याला नोकरीसाठी पाठवण्यात आले नाही. यामुळे राज्यातील तरुणांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. राज्यात बेरोजगारांची संख्या मोठी असताना, ही सुवर्णसंधी वाया जाण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये नाराजी वाढली आहे.

या करारानुसार उच्च व तंत्रशिक्षण, कौशल्य विकास व उद्योजकता, उद्योग, कृषी आणि वैद्यकीय शिक्षण विभागांतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन जर्मनीमध्ये आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळात सहभागी करण्यात येणार होते. यासाठी 70 कोटी रुपयांचा निधी सरकारकडून मंजूर झाला होता. या योजनेंतर्गत तंत्रज्ञ, वैद्यकीय व्यावसायिक, शेती तंत्रज्ञानाशी संबंधित कर्मचारी तसेच औद्योगिक क्षेत्रात प्रशिक्षित कामगारांना प्राधान्य देण्यात आले होते. पण आजवर एका विद्यार्थ्यालाही ही संधी मिळाली नसल्याचा आरोप सरकारी मान्यताप्राप्त रिक्रूटमेंट एजंट चित्रा उबाळे यांनी केला आहे. सरकारने केवळ कागदोपत्री करार करून प्रचार केला. प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र शून्य, अशी टीका त्यांच्याकडून करण्यात आली. या संदर्भात जर्मनीचे मंत्री, अधिकाऱ्यांचा प्रतिनिधीमंडळ आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञ आज मुंबईत राज्य सरकारबरोबर चर्चा करण्यासाठी येणार आहे. जर्मनीत रोजगार मिळवण्यासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये यामुळे पुन्हा एकदा आशेचा किरण निर्माण झाला आहे. महाराष्ट्राच्या तरुणांकडे कौशल्याची कमतरता नसताना, केवळ सरकारी उदासीनतेमुळे जागतिक स्तरावरील संधी निसटत असल्याचा सवाल अनेक तज्ज्ञांकडून उपस्थित केला जात आहे. एकीकडे राज्यातील शेकडो बेरोजगार रोज नोकरीच्या मागे धावतात, विविध परीक्षा देऊनही त्यांना रुजू होण्यास वर्षे लागतात आणि दुसरीकडे थेट परदेशात मिळणारी नोकरीच नाकारली जाते, अशी टीका जोर धरत आहे. महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील अनागोंदीचे आणखी एक उदाहरण मुंबईत पाहायला मिळाले आहे. मालाड पूर्वेतील आप्पा पाडा परिसरातील स्वामी विवेकानंद हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना मागील काही दिवसांपासून गॅलरी व मोकळ्या जागेत बसून शिकण्याची वेळ आली आहे. शाळेतील दोन ट्रस्टींमध्ये सुरु असलेल्या वादामुळे वर्गखोल्यांना कुलूप लावण्यात आले असून त्याचा फटका थेट विद्यार्थ्यांना बसत आहे. मुलांना ना बसायला जागा, ना शिकण्यासाठी योग्य वातावरण, शाळेच्या गॅलरीत गर्दीमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीती निर्माण झाली असून पालक आणि शिक्षक वर्ग संताप व्यक्त करत आहेत. शाळेच्या ट्रस्टींचा वाद चॅरिटी कमिशनपर्यंत पोहोचला आहे, पण त्यादरम्यान मुलांचे नुकसान होत आहे. शिक्षक आणि पालकांनी प्रशासनाला याप्रकरणात त्वरित हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. आमच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान थांबवा, अशी आर्त विनंती ते करतात. नव्या पिढीचं शिक्षण, कौशल्य आणि भविष्य सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सरकार आणि शिक्षण व्यवस्थेची आहे.

२ भारत संग्राम
EDITORIAL
वाशिम, शुक्रवार
दि. ५ डिसेंबर २०२५
dainikbharatsangram@gmail.com

## थोडक्यात



### नाशिकमध्ये पाठलाग करत डाळिंब व्यापाऱ्याला लुटले

भारत संग्राम | प्रतिनिधी

**नशिक :** नाशिकमधील दवे पिंपळगाव येथून रक्कम घेऊन येत असताना किशोरवाकोडे आणि त्याच्या मित्राने दुचाकीने बसचा पाठलागकरत दुचाकी आडगावनाका येथे उभी केली. बसथांब्यावर येण्यापूर्वी केलकर याला रिक्षा घेऊन बोलावूनघेतले. दवे बसमधून उतल्यानंतर थांब्यावर उभ्याचालकाने कुठे जायचे विचारले, दवे रिक्षात बसल्यानंतरकाही अंतरावर मागे बसलेल्या दोघांनी मारहाण करतशस्त्राचा धाक दाखवत रक्कम बळजबरीने घेत रिक्षातूनढकलून दिले. पथकाने सीसीटीव्हीच्या साह्याने रिक्षाचामालक शेख (रा. वडाळा) हा असल्याचे समजले.चौकशीत रिक्षा केलकरला भाडेतत्त्वावर चालवण्यासदिल्याचे समजले. संशयिताला वडाळा येथून ताब्यातघेतले. चौकशीत लूट कट रचून केल्याची कबुली दिली. डाळिंब व्यापाऱ्यावर पाळत ठेवत लुटीचा कटरचून तीन संशयितांनी व्यापाऱ्यास लुटल्याचेतपासात निष्पन्न झाले. पंचवटी पोलिसांनीपिंपळगाव ते नाशिक मार्गावरील 22सीसीटीव्हींची तपासणी करत संशयित रिक्षाचामाग काढत चालकाला अटक केली.संशयिताकडून चार लाख 50 हजारांची रक्कमजप्त करण्यात आली. गौरव केलकर असे यासंशयिताचे नाव आहे. व्यापारी प्रवीणभाई दवे हे 1 डिसेंबर रोजीसायंकाळी पिंपळगाव येथून व्यापाऱ्यांचे पैसेदेण्याकरता एस.टी. बसने नाशिकला आले.आडगावनाका येथे उतरले. रिक्षाला हात दिला.पेठ फाटा येथे सोडण्यास सांगितले.चालकासह दोघा प्रवाशांनी पंचमुखी हनुमानमंदिरासमोर रिक्षात मारहाण करत रक्कमबळजबरीने घेत रिक्षातून ढकलून पलायन केले होते. पथकाने पिंपळगाव तेआडगावनाक्यापर्यंत सीसीटीव्हींची तपासणीकरत संशयित रिक्षाचा माग काढत एका संशयिताला अटक केली. दोघांची नावे निष्पन्न केले. वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र पाटील, प्रकाश नेमाणे, महेश नांदुर्डीकर, संतोष पवार, अंकुश काळे आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

### हिंगोलीमध्ये 73 वर्षीय अजोबाकडून नातीचा विनयभंग

भारत संग्राम | प्रतिनिधी

**औंढा :** नागनाथ पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात नातीचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी तिच्या 73 वर्षीय आजोबा विरुध्द औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुरुवारी ता. 4 गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यास ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औंढा नागनाथ पोलिस ठाण्यातर्गत एका गावात अल्पवयीन नात व तिचे आजोबा दोघेच घरी होते. घरातील बाकी मंडळी शेतात कामासाठी गेली होती. यावेळी घरी कोणी नसल्याचा गैरफायदा घेत 73 वर्षीय आजोबाने नातीचा विनयभंग केला. मात्र त्याच्या कृत्याकडे दुर्लक्ष करून मुलगी चहा करीत असतांना त्याने पुन्हा एकदा विनयभंग केला. सदर प्रकार कोणाला सागितला तर स्वच्छतागृहात नेऊन जिवे मारून टाकतो अशी धमकी दिली. या प्रकारामुळे ती मुलगी घाबरून गेली दोन दिवस तीने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. दरम्यान, मात्र आजोबाकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून तिने हा प्रकार तिच्या कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर तिच्या कुटुंबियांनी सर्व परिस्थिती पाहून थेट औंढा नागनाथ पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी 73 वर्षीय आजोबावर विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक जी. एस. राहिले, उपनिरीक्षक शेख खुद्दूस, दत्ता कानगुले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांच्या पथकाने त्या आजोबाला ताब्यात घेतले आहे. उपनिरीक्षक शेख खुद्दूस पुढील तपास करीत आहेत.

### टवाळखोरांना मनपा शरण,आता सहालाच 'सिद्धार्थ' बंद

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** सिद्धार्थ उद्यान आणि प्राणि संग्रहालयात टवाळखोरांचा उपद्रव आणि सुरक्षा रक्षकांशी होणारे वाद वाढल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. उद्यानाची वेळ एक तासाने कमी करण्यात आली असून, आता हे उद्यान सायंकाळी 7 ऐवजी 6 वाजता बंद होणार आहे. मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांनी हा निर्णय मंजूर केला. दुपारनंतर, विशेषतः सिंह, वाघ, बिबटे आणि सर्पालय पाहण्यासाठी जेव्हा मोठी गर्दी होते, त्याच वेळी 15 ते 25 वयोगटातील तरुणांकडून अरेरावीचे प्रकार वाढले होते. या टवाळखोरांकडून सुरक्षा रक्षकांशी हुज्जत घालणे, अश्लील हावभाव करणे आणि त्यांच्या अंगावर धावून जाण्याचे प्रकार सतत घडत होते. पोलिस आणि दामिनी पथकाची गस्त असूनही, पोलिस निघून गेल्यावर वादाचे प्रकार पुन्हा उफाळून येत असल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात होती. सततच्या तक्रारी लक्षात घेऊन, उद्यान अधीक्षक विजय पाटील यांनी उद्यानाची वेळ एक तासाने कमी करण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवला होता. सध्या हिवाळा असल्याने दिवस लवकर मावळतो. त्यामुळे, सायंकाळी 6 वाजता तिकीट विक्री बंद करून उद्यान पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. उन्हाळ्यात परिस्थिती सुधारल्यास उद्यानाची वेळ पुन्हा 7 वाजेपर्यंत करण्याची योजना आहे.

# १७ ईव्हीएमचे सील तोडून पुन्हा मतदान: गोंदियाच्या सालेकसा नगपंचायत येथील प्रकार

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये बोगस मतदान, दडपशाही व सर्व नियम धाब्यावर बसवून मतदान झाले. गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा नगर पंचायतीचे मतदान संपल्यानंतर १७ ईव्हीएम मशीनचे सील तोडून पुन्हा मतदान केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पण अद्याप एफआयआरही दाखल करण्यात आला नाही. हा सर्व प्रकार लोकशाहीचे वस्त्रहरण करणारा आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, राज्यात १० वर्षानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. परंतु या




निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्ष, प्रशासन व निवडणूक आयोग यांनी निवडणूक प्रक्रियेची थट्टा केली आहे. काँग्रेस पक्ष सातत्याने निवडणूक प्रक्रिया सुधारण्यावर भर देत आहे. मतचोरी, मतदार याद्यांमधील घोळ, यावर आवाज उठवत आहे, पण त्यात काहीही सुधारणा होताना दिसत नाही. निवडणूक आयोगाने आतातरी डोळे उघडावे. निवडणूक आयोगाला टी. एन. शेषन यांच्यासारख्या कणखर निवडणूक आयुक्ताची गरज आहे. मतचोरी प्रश्नी काँग्रेस पक्षाने १४ डिसेंबर रोजी दिल्लीत देशपातळीवर मोठी रॅलीही आयोजित केली आहे, असे सपकाळ म्हणाले. राज्यात मे महिन्यापासून ऑक्टोबर महिन्यापर्यंत पावसाने धुमाकुळ घातला. शेतातील पिकं वाहून गेली, शेत जमीन खरडून गेली, सर्व हंगाम वाया गेला, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. सरकारने ३३ हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिल्याचे जाहीर केले, पण ते कोणाला मिळाले हे माहित नाही. केंद्र सरकारकडे नुकसान भरपाईसाठी प्रस्तावही पाठवला नाही. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी लोकसभेत महाराष्ट्र सरकारची लाज काढली. महाराष्ट्र सरकारने प्रस्ताव पाठवला नाही हे केंद्रीय कृषी मंत्र्यांनीच सांगितले, यावरून भाजपा महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किती खोटे बोलतात हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. केंद्र सरकारकडून राज्याला निधी आणला नाही व प्रस्तावही पाठवला नाही कारण भाजपा महायुती सरकारला शेतकऱ्यांना मदतच करायची नाही, असे सपकाळ यांनी म्हटले आहे.


हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारचे 1 वर्ष बौद्धिक व आर्थिक दिवाळखोरीचे ठरल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, राज्यातील भाजपा महायुती सरकारला एक वर्ष पूर्ण होत आहे. मतचोरी करून सत्तेत आलेल्या सरकारची एका वर्षातच बौद्धिक व आर्थिक दिवाळखोरी निघाली आहे. सत्तेत येताना लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार, शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणार, नोकर भरती करणार अशी आश्वासने दिली होती पण त्याचा आता महायुती सरकारला विसर पडला आहे. कोयता गँग, खोके, आका, वाळू माफिया, ड्रग्ज माफिया हे महायुती सरकारने राज्याला दिले आहे. जाती धर्मात वाद निर्माण करण्याचे काम सरकारने केले असून 'पैसा फेक तमाशा देख', हे वगनाट्य जोरात सुरु आहे. पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळ्यात अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांना वाचवण्यात येत असल्याचा आरोपही सपकाळ यांनी यावेळी केला. पुण्यातील मुंढवा जमीन खरेदी भ्रष्टाचार प्रकरणी शितल तेजवानी यांना केलेली अटक म्हणजे त्यांना बळीचा बकरा करण्यात आले आहे. या प्रकरणातील जमीन खरेदी करणाऱ्या कंपनीचा मालक उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार याच्यावर कसलीही कारवाई केलेली नाही व सरकार करणारही नाही, असेही ते म्हणाले. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी तपोवनातील शेकडो वृक्षांची कत्तल करणे म्हणजे अधर्म आहे. याच तपोवनात प्रभू रामचंद्र, मातासीता व लक्ष्मण यांनी वास्तव केल्याचे सांगितले जाते. या पवित्र वनातील झाडांची कत्तल करून भाजपा महायुती सरकार आपला अध्यात्मिक वारसाच संपुष्टात आणत आहे आणि हा अधर्म आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## प्रेम प्रकरणात फसवणूक:तृतीयपंथीयाची आत्महत्या, पारलिंगी समुदायाच्या गुरू व नातेवाईकांचा गंभीर आरोप

भारत संग्राम | प्रतिनिधी

**सोलापूर :** सोलापूरमधून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक केल्याने पारलिंगी समुदायातील एका व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. बाळे येथील रहिवासी असलेल्या या व्यक्तीने गळफास घेत आत्महत्या केली आहे. तसेच आत्महत्या करण्यापूर्वी एक व्हिडिओ तयार करत या व्यक्तीने आपल्या भावना व्यक्त केल्या असून संबंधित तरुणावर गंभीर आरोप केले आहेत.

पारलिंगी समुदायातील व्यक्तीने आत्महत्या करण्यापूर्वी व्हिडिओ तयार करत संबंधित तरुणावर आरोप केले. या व्हिडिओमध्ये असे म्हटले की, माझे आणि त्याचे मागील आठ वर्षांपासून संबंध आहेत, त्याने माझ्यासोबत लग्न



केले आणि मला दुसरीकडे आणून ठेवले. माझ्या समाजाशी माझे संबंध तोडले आणि आता तो दुसरे लग्न करत आहे, त्यामुळे मी आत्महत्या करत असून याला पूर्णपणे तोच जबाबदार आहे, असा दावा पारलिंगी ससमुदायातील व्यक्तीने केला आहे. या घटनेनंतर सोलापूरच्या शासकीय रुग्णालय परिसरात पारलिंगी समुदायातील व्यक्तींनी मोठी गर्दी केली असून आरोपी तरुणावर कारवाई करण्याची मागणी मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी केली आहे. या घटनेसंदर्भात पारलिंगी समुदायातील गुरूंनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेल्या पारलिंगी समुदायातील व्यक्तीचे एका तरूणाशी प्रेमसंबंध होते. त्या दोघांनी एकमेकांशी लग्न केले. एक वर्षभर आम्हाला भेटू दिले नाही. कोणाशीही बोलू दिले नाही. घराच्या बाहेर जाऊ दिले नाही. मारहाण देखील केली. तो तरूण दुसरीकडे लग्न करत आहे. माझ्या शिष्याने मरण्यापूर्वी केलेला व्हिडीओ देखील आमच्याकडे आहे. त्या व्हिडीओमध्ये माझ्या शिष्याने सगळे सांगितले आहे. फसवणूक केलेल्या तरूणावर तातडीने कारवाई करून आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी देखील पारलिंगी समुदायातील गुरूंनी केली आहे. मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघांचे 12 वर्षांपासून एकमेकांवर प्रेम होते. त्या तरुणाने फसवणूक करून पैसे, सोने सर्वकाही लुटले. जिथे राहत होता तिथून दुसरीकडे राहण्यासाठी घेऊन गेला. मारहाणही करत होता. त्या तरुणाने फसवणूक केली आणि आता दुसरीकडे लग्न करत आहे आणि त्यामुळेच आत्महत्या केल्याची माहिती नातेवाईकांनी दिली आहे.

## छत्रपती संभजीनगर मनपाकडे रस्त्यांच्या 'डीपीआर'ला नाहीत पैसे

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** महापालिकेने शहरातील रस्त्यांच्या रुंदीकरणाचीमोहीम हाती घेतली. त्यासाठी विकास आराखड्यानुसार रस्त्यात येत असलेल्या मालमत्ता पाडल्या. त्यानंतर सरकारकडे रस्त्यांसाठी 2,700 कोटी रुपयांची मागणी केली.मात्र, त्याचा 'डीपीआर' (सविस्तर प्रकल्पअहवाल) तयार केलेला नव्हता. त्यासाठी महापालिकेकडे पैसे नाहीत. आता रस्त्याच्या कामांना तात्पुरता 'टेकू' देण्यासाठी 'स्मार्टसिटी'ने 15 कोटी रुपयांची रक्कम महापालिकेकडे वर्ग करण्यास मान्यता दिली आहे. या निधीतून 'डीपीआर' तयार करण्यात येणार आहे.

अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर महानुभावआश्रम-नक्षत्रवाडी, सिडको बसस्टँड-हर्सूल टीपॉइंट, बीड बायपास, जुना जळगाव रोड-सातारा लिंक, जालना रोड हे 5 प्रमुख रस्ते विद्रूप झाले आहेत. स्मार्ट सिटीच्या बैठकीत रस्त्यांच्याकामाच्या 'डीपीआर'साठी 15 कोटी रुपयेदेण्याचा निर्णय झाला. या वेळी अध्यक्षा विनीता सिंघल, पोलिस आयुक्त प्रवीण पवार, मनपा आयुक्त व स्मार्ट सिटीचे सीईओ जी. श्रीकांत,जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, संचालक भास्कर मुंडे व उल्हास गवळी उपस्थित होते.

## अमरावतीमध्ये चारित्र्यावर संशय घेवून पतीने केला पत्नीचा खून

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** चारित्र्यावर संशय घेत पतीने पत्नीचा खून केल्याची धक्कादायक घटना अचलपूर तालुक्यातील खैरी येथे गुरूवारी (दि. 4) उघडकीस आली. या प्रकरणी पसार होण्याच्या तयारीत असलेल्या आरोपी पतीला आसेगाव पोलिसांनी अटक केली आहे.

जानराव उर्फ ज्ञान्या भोसले (35, रा. खैरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याची पत्नी सबाना जानराव भोसले (वय 32) हिचा त्याने खून केला आहे. पती जानराव हा पत्नीच्या चारित्र्यावर सातत्याने



संशय घेत तिच्याशी वारंवार भांडणे करत होता. भांडण थांबवण्यास गेलेल्या वस्तीतल्या नागरिकांनाही तो शिवीगाळ व मारहाण करत असल्याने कोणतीही व्यक्ती त्यांच्या भांडणात हस्तक्षेप करण्यास धजावत नव्हते, असे स्थानिकांनी सांगितले. याशिवाय, जानरावने सासू सासऱ्यांनाही मारहाण करून त्यांना घराबाहेर काढून दिले होते. परिणामी त्यांच्यावर अत्यंत हालअपेष्टा सहन करण्याची वेळ आली होती. मृत दांपत्यास दोन लहान मुले आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी फॉरेन्सिक व्हॅन वफिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण करून पुरावे संकलित केले. 3 डिसेंबरला रात्री अंदाजे 10 ते 12 वाजण्याच्या दरम्यान जानरावचे पत्नीसोबत कडाक्याचे भांडण झाले. यावेळी त्याने बांबूने पत्नीच्या चेहऱ्यावर, छातीवर, पाठीवर,मांडीवर व पोटरीवर जबर मारहाण केली.

## CCTNS कामगिरीत हिंगोली जिल्हा राज्यात अव्वल: जिल्ह्याने मिळविले १०० टक्के गुण

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात पोलिस दलात सुरु करण्यात आलेल्या सीसीटीएनएस मध्ये हिंगोली जिल्ह्याने १०० टक्के गुण मिळवत राज्यात अव्वल क्रमांक मिळविला आहे. राज्यातील ५३ युनीटमधून हिंगोलीने पहिला क्रमांक मिळविला असून पोलिस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जिल्हा पोलिस दलाच्या कामाचे कौतूक केले आहे.

राज्यात पोलिस दलामध्ये सीसीटीएनएस प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे. राज्यातील ५३ युनीटमधून हि कार्यप्रणाली सुरु असून वेळोवेळी या कार्यप्रणाली अंतर्गत कामकाजाचा आढावा घेतला जातो. या प्रणालीमध्ये तक्रारदारांची तक्रार घेऊन ऑनलाईन मध्ये गुन्हे दाखल करुन सर्व गुन्ह्याचा तपास हा वेळे मध्ये सीसीटीएनएस प्रणाली मध्ये भरण्यात येत असतो. तसेच या प्रणाली द्वारे आरोपींची पार्श्वभुमी तपासून त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येतात. हिंगोली जिल्हयामध्ये पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सीसीटीएनएस प्रणालीसाठी नोडल अधिकारी म्हणुन अप्पर पोलिस अधिक्षक कमलेश मीना यांची नियुक्ती केली आहे. तसेच जिल्हयातील १३ पोलिस ठाण्यांमधून स्वतंत्र कर्मचारी व त्यांच्यावर देखरेख अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. या शिवाय जिल्ह्याच्या ठिकाणा जमादार पांडुरंग हमाने, राहुल तडकसे व महिला पोलीस अंमलदार पुजा जाधव यांची नियुक्ती केली असून त्यांच्या मार्फत हे कामकाज सुरू आहे. पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधिक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे यांच्याकडून सीसीटीएनएस कामकाजाचा आढावा घेतला जात आहे. सीसीटीएनएसमध्ये कामकाजाचा पुणे येथील गुन्हे अन्वेषण विभागाकडून प्रत्येक महिन्यात डाटा फिडिंग, विविध पोर्टल, ऑनलाईन कामकाज, चांगल्या कामगिरीचा अहवाल तयार केला जातो. यामध्ये हिंगोली जिल्हयाने २०१ पैकी २०१ गुण मिळवित राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे.

## राणीच्या बागेतील रुद्र नावाच्या वाघाचाही मृत्यू: दोन्ही वाघांच्या मृत्यूचे कारण दडपले जात आहे का?

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईच्या भायखळा इथल्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणीसंग्रहालयात शक्ती नावाच्या वाघाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. आता त्यानंतर राणीच्या बागेतील रुद्र नावाच्या वाघाचा सुद्धा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. शक्ती आणि करिष्मा यांचा रुद्र हा बछडा होता. राणीच्या बागेतच त्याचा जन्म झाला होता. रुद्रचा इन्फेक्शनमुळे मृत्यू जल्याकगी प्राथमिक माहिती आहे. मात्र मृत्यू अहवाल समोर आल्यावरच नेमके कारण स्पष्ट होऊ शकणार आहे.

या संदर्भात मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, रुद्रच्या मृत्यूनंतर शक्ती वाघाचा मृत्यू झाला आहे. मात्र या दोन्ही वाघांच्या मृत्यूचा अहवाल समोर आला नसल्याने नेमके कारण स्पष्ट होत नाहीये. तसेच जिजामाता उद्यान प्रशासनाकडून देखील याबाबत माहिती देण्यात आली नसल्याचे समोर आले आहे. यामुळे या दोन वाघांच्या मृत्यूचे कारण तसेच माहिती दडवली जात आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, भाजपचे दक्षिण मुंबईचे सरचिटणीस नितीन बनकर यांनी संताप व्यक्त केला आहे. रुद्र वाघाच्या मृत्यूबाबत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी उद्यान प्रशासनाकडे केली आहे. तसेच पुढील सात दिवसांच्या आत भूमिका स्पष्ट केली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा नितीन बनकर यांनी दिला आहे. शक्ती तसेच रुद्र वाघाच्या मृत्यूनंतर व्याघ्र प्रेमी प्रथमेश जगताप यांनी संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, मुंबईतील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणीसंग्रहालयातून शक्ती वाघाच्या मृत्यूची घटना समोर आली आहे. त्याचा मृत्यू संशयास्पदरित्या झालेला आहे. प्राणीसंग्रहालय प्रसासन व त्याच्यावरती उपचार करणारे पशुवैद्यकीय अधिकारी यांचा हलगर्जीपणा झाल्याने हा मृत्यू झाला आहे. शक्ती वाघाचा मृत्यू झाल्यानंतर ही घटना प्रसिध्द न करणे, त्याची माहिती न देणे, यामागचे नेमके काय कारण आहे, हे सर्व लपवून का ठेवण्यात आले, त्यामागे काय कारण होते? असा सवाल जगताप यांनी उपस्थित केला आहे. तसेच व्याघ्र प्रकल्पातील एका वाघाचा मृत्यू झाला तर वनविभाग त्याची बातमी दुसऱ्या दिवशी जाहीर करते पण वाघाचा मृत्यू झाल्यानंतर आठ दिवस उलटूनही याची बातमी जाहीर न करणे, यामागचे कारण काय आहे, या वाघाचा मृत्यू माझ्या माहितीप्रमाणे त्याच्या श्वसननलिकेजवळ एक हाड अडकून त्याचा मृत्यू झाला आहे. पण त्याच्यावरती उपचार का केले नाहीत? त्याचा मृत्यू झाला ही गोष्ट लपवून ठेवण्यामागचे कारण काय आहे, याच्यामध्ये संशयास्पद मृत्यू झाला आहे. त्याचबरोबर त्याचा शवविच्छेदन अहवाल येण्याआधीच त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली, याचे काय कारण आहे, असा सवालही प्रथमेश जगताप यांनी उपस्थित केला आहे.

भारत संग्राम (मराठी दैनिक) ● RNI No. MAHMAR/2020/79677
मुद्रक - महादा आश्रु हिवाळे प्रकाशक - महादा आश्रु हिवाळे मालक - महादा आश्रु हिवाळे मुद्रण स्थळ - आधार प्रिंटर्स महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) प्रकाशन स्थळ - कार्यालय दैनिक " भारत संग्राम ", महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) संपादक - महादा आश्रु हिवाळे (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)


## थोडक्यात



### महाराष्ट्र 'राजभवन' झाले आता 'लोकभवन':राज्यपालांच्या निर्देशानुसार नामकरण, सामान्य नागरिकांसाठी अधिक खुले करण्याचे उद्दिष्ट

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**मुंबई :** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनाचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले होते. राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे असे राज्यपालांनी सांगितले होते. 'लोकभवन' म्हणून ओळखले जाणारे राजभवन आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय न राहता, राज्यातील नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद व सहभाग यांचे एक केंद्र व्हावे अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. 'लोकभवन' हे सरकार आणि राज्यातील जनतेमध्ये सेवा, सहकार्य व संवादाचा सेतू व्हावे, हीच या नामांतरामागची भूमिका आहे, असे त्यांनी सांगितले. 'लोकभवन' केवळ संवैधानिक कर्तव्यांपुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आशा, आकांक्षा आणि समस्यांप्रीति संवेदनशील राहून त्यांच्याशी थेट नाते जपणारे खऱ्या अर्थाने लोक भवन असेल असे राज्यपालांनी स्पष्ट केले. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक व्हिडिओ शेअर करत ट्विट केले आहे. ते म्हणाले, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनाचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. 'लोकभवन' हे केवळ राज्यपाल यांचे निवासस्थान व कार्यालय नसून राज्यातील नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटना यांच्यासह संवाद आणि सहभाग साधणारे एक केंद्र आहे.



### आमदारपुत्र समाधान सर्वणकर आणि अभिनेत्री तेजस्विनी लोणारी विवाहबंधनात

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार सदा सर्वणकर यांचे सुपुत्र तसेच शिवसेना युवा नेते समाधान सर्वणकर हे लग्न बंधनात अडकले असून त्यांचा विवाह मराठमोळ्या अभिनेत्री तेजस्विनी लोणारीशी झाले आहे. मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हा विवाहसोहळा संपन्न झाला. सोशल मीडियावर सध्या या लग्नाचे फोटो व व्हिडिओ चांगलेच व्हायरल होत आहेत. समाधान सर्वणकर आणि तेजस्विनी लोणारीचा साखरपुडा हा 26 ऑक्टोबर रोजी पार पडला होता. त्यानंतर तेजस्विनीच्या मेहंदी आणि हळदी सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर पाहायला मिळाले होते. आता दोघांचेही लग्न पार पडले असून या लग्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली होती. फडणवीस यांनी दोघांनाही पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. लग्न सोहळ्यात तेजस्विनीने गुलाबी रंगाची पैठणी नेसली होती. यावेळी तेजस्विनी वधूच्या गेटअपमध्ये अधिकच खुलून दिसत होती. तर समाधान यांनी ऑफ व्हाइट रंगाचा शेरवानी परिधान केला होता. एकंदरीतच दोघांचा विवाहसोहळा उत्साहात व आनंदात पार पडला. यावेळी राजकीय नेते तसेच मराठी कलाकारांनी उपस्थिती लावल्याचे पाहायला मिळाले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांनी देखील दोघांना शुभेच्छा दिल्या. तेजस्विनी लोणारीने मंदार शिंदे यांच्या नो प्रॉब्लेम या चित्रपटातून पदार्पण केले होते. त्यानंतर मकरंद अनासपुरे यांच्यासोबत दोघात तिसरा आता सगळं विसरा, गुलदस्ता या चित्रपटात आपल्या अभिनयाने छाप सोडली होती. तसेच देवमाणूस या मालिकेतून तेजस्विनीने घराघरात आपले स्थान निर्माण केले होते. आता समाधान सर्वणकर यांच्याशी लग्न करत तेजस्विनी राजकीय कुटुंबाशी जोडली गेली आहे.

## पान एक वरून

चित्रपटसृष्टीत बऱ्याच काळापासून पैशांच्या बदल्यात चांगले रिव्ह्यू देण्याचा मुद्दा सुरू आहे. वेळोवेळी अनेक अभिनेते आणि चित्रपट निर्मात्यांनी या प्रथेला विरोध केला आहे. आता अभिनेत्री यामी गौतमने चित्रपटसृष्टीत मार्केटिंग हायपसाठी पैसे देण्याच्या प्रथेवर टीका केली आहे. तिने याला खंडणी आणि ब्लॅकमेलिंगचे साधन म्हटले आहे. आपले मत मांडताना यामीने तिच्या एक्स (ट्विटर) वर एक लांब पोस्ट लिहिली आहे. पोस्टमध्ये तिने लिहिले आहे की, जे लोक या प्रथेला नकार देतात, त्यांना चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच नकारात्मक कव्हरेजद्वारे लक्ष्य केले जाते. तिने याला खंडणीचा एक प्रकार आणि एक धोकादायक संस्कृती म्हटले आहे, ज्यामुळे भारतीय सिनेमाच्या भविष्याला हानी पोहोचू शकते असेही तिने म्हटले.

# संसदेत खासदार विशाल पाटलांचा संताप:सांगलीचा शौर्य दिल्लीत बळी

## एफआयआर नंतरही अटक नाही, संसदेतून शौर्यला न्यायाची मागणी

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**मुंबई :** देशभरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर वाढत चाललेला मानसिक ताण, शिक्षकांकडून होणारा छळ आणि त्यातून विद्यार्थी आत्महत्यांच्या घटना वाढत असल्याचे वास्तव पुन्हा एकदा उघडकीस आले आहे. सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील धवळेश्वर येथील 16 वर्षीय शौर्य प्रदीप पाटील या विद्यार्थ्याने दिल्लीत शिक्षण घेत असताना स्वतःचा जीव घेतला. दिल्लीतल्या प्रसिद्ध सेंट कोलंबस शाळेतील शिक्षकांकडून सतत मानसिक त्रास दिला जात असल्याचा उल्लेख शौर्यने आपल्या सुसाईड नोटमध्ये केला आहे. याच पार्श्वभूमीवर सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी लोकसभेत हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला आणि शौर्यच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी सरकारकडे केली. या प्रकरणी गुन्हा नोंद झालेला असला, तरी अद्याप कोणत्याही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही, याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांचा उल्लेख करताना खासदार पाटील यांनी चिंताजनक आकडेवारी पुढे मांडली. त्यांनी सांगितले की, देशात गेल्या दहा वर्षांत विद्यार्थी आत्महत्यांचे प्रमाण 8 हजारांवरून 13 हजारांपर्यंत वाढले आहे. आरटीई कायद्यानुसार शाळांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि इतर मागास घटकांतील किमान 25 टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे. मात्र अनेक खासगी शाळा हा नियम टाळण्यासाठी अशा विद्यार्थ्यांना टार्गेट करतात, त्यांच्यावर मानसिक दबाव टाकतात आणि अखेरीस शाळा सोडण्यास भाग पाडतात, असा गंभीर आरोप त्यांनी संसदेच्या पटलावर मांडला. शौर्यसोबतही असेच घडले असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. शिक्षणाच्या नावाखाली अत्याचार सहन करणाऱ्या मुलांना न्याय मिळालाच पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. विशाल पाटील यांनी संसदेतून सरकारला आवाहन केले की, दोषींना त्वरित अटक करावी आणि अशा घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी आरटीई कायद्यातील उणिवा दुरुस्त कराव्या. खासगी शाळांवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र चौकशी यंत्रणा तयार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोषींना कठोर शिक्षेची कारवाई झाली तरच शिक्षक व शाळांचा मनमानीवर अंकुश बसेल आणि भविष्यात कोणत्याही मुलाला असा छळ सहन करावा लागणार नाही, असे त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले. शौर्य पाटील याला न्याय मिळवून देण्यासाठी स्वतः आणि त्यांचे कुटुंब शेवटपर्यंत लढतील, असेही खासदारांनी जाहीर केले. दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू असून, न्यायालयाने दिल्ली पोलिसांना त्वरित तपास स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पुढील सुनावणी 12 मार्च रोजी होणार आहे. सुनावणीदरम्यान पोलिसांनी न्यायालयाला माहिती दिली की शाळेतील सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले आहेत आणि त्यातील काही दृश्यांमधून शाळेविरुद्ध केलेल्या आरोपांची पुष्टी होत असल्याचे प्राथमिक निष्कर्ष दिसत आहेत. शौर्यच्या वडिलांनी दाखल केलेल्या याचिकेमध्ये, तपास दिल्ली पोलिसांकडून काढून सीबीआयकडे हस्तांतरित करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे सीबीआयकडूनही या संदर्भात अहवाल मागवण्यात आला आहे. प्रकरणातील स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशीच्या मागणीला न्यायालयानेही गांभीर्याने घेतले आहे.

## निवडणुकीच्या तारखा पुढे ढकलल्याने आयोगाला हायकोर्टाची तंबी

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका तसेच त्यांच्या निकालाच्या तारखा ऐनवेळी पुढे ढकलल्याबद्दल उच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला तीव्र शब्दांत फटकारले आहे. नागपूर खंडपीठापाठोपाठ मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानेही निवडणूक आयोगाच्या 'भोंगळ कारभारावर' तीव्र नाराजी व्यक्त केली.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठापुढे संबंधित याचिकांवर सुनावणी झाली. न्यायालयाने स्पष्ट केले की, ऐनवेळी निवडणुका लांबणीवर टाकणे टाळता येण्यासारखे होते, आयोगाकडून झालेला हा निर्णय योग्य नव्हता. अशी कोणतीही आपातकालीन स्थिती नव्हती की, ज्यामुळे निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या. निवडणूक आयोगाने कॅलेंडर पाळायला हवे होते, असे महत्त्वाचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. निवडणूक आयोगाने 72 तासांपूर्वी हा निर्णय घेऊन 'प्रशासकीय दूरदृष्टीच्या अभावाचे प्रदर्शन' केले आहे आणि असे करताना 'संवैधानिक शिस्त' पाळली नाही, अशा शब्दांत हायकोर्टाने आयोगाला तंबी दिली. यापूर्वी, निवडणूक आयोगाने 72 तासांच्या आत 24 नगराध्यक्ष आणि 150 पेक्षा जास्त नगरसेवक प्रभागातील निवडणुका पुढे ढकलल्या होत्या, ज्यामुळे उमेदवारांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.

## कारवरचे नियंत्रण सुटल्यामुळे भीषण अपघात

### अपघातात डॉ . ऋषिकेश काटे जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ सचिन खंडारे**






**बुलढाणा :** चिखली–देऊळगाव राजा मार्गावर बेराळा फाट्याजवळ येथे भीषण अपघात सदर घटना सायंकाळी 5 ते 6 वाजेदरम्यान घडली आहे ` . राष्ट्रीय महामार्ग चिखली–देऊळगाव राजा मार्गावर असलेल्या बेराळा फाटा येथे भीषण अपघात झाला ! मिळालेल्या माहितीनुसार, चिखली–देऊळगाव राजा मार्गावर बेराळा फाट्याजवळ थोडेसमोर वळण होते या वळणावर गाडी नियंत्रित न झाल्यामुळे भीषण अपघात घडला ` या संपूर्ण घटनेमुळे चिखली–देऊळगाव राजा मार्गावर झालेला भीषण अपघात हा शब्दशः काळजाला चटका लावणारा प्रकार ठरला आहे ` सायंकाळी पाच ते सहा वाजताच्या दरम्यान गाडी क्रमांक XVV 700 आणि MH 28 BW 9394 नंबरची कार मेहकर दिशेने जात असताना अचानक गाडीचा ताबा सुटल्यावर सदर कार दुभाजकाला धडकली ` हा अपघात एवढा जोराचा होता की डॉक्टर काटे यांच्या डोक्याला जबर मार लागल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला ` गाडीत दोन जण प्रवास करत होते. त्यापैकी डॉ ऋषिकेश काटे यांचा जागीच मृत्यू झाला तर वैभव जाधव हा गंभीर जखमी झाला आहे. जखमीला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले आहे.गाडीचा नंबर पाहता ही चारचाकी मेहकर येथील 'काटे' कुटुंबाच्या मालकीची असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अपघातानंतर रस्त्यावर मोठी गर्दी जमा झाली होती. घटनास्थळी चिखली पोलीस स्टेशनचे गजानन काकडे आणि प्रशांत जायभाये यांनी तत्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या भीषण अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून , डॉक्टर ऋषिकेश काटे हे सोनोग्राफी सेंटर चालवतात ` साखरखेर्डा येथे सुद्धा त्यांचे सोनोग्राफी सेंटर होते ` साखरखेर्डा ते मेहकर ते नेहमी येजा करत होते , अतिशय सोज्वळ व प्रेमळ व्यक्तिमत्व असलेले ऋषिकेश काटे यांच्या निधनाची वार्ता पसरतात त्यांचे मूळ गाव असलेल्या संपूर्ण पांगरी काटे गावात तसेच परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे `

## संत शिरोमणी सावता महाराज मुर्तीची मिरवणूक प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा संपन्न !

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



दि. ०४ डिसेंबर रोजी सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा नगरीतून संत सावता माळी यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. सदर मिरवणूक संत सावता महाराज मंदिर पासून - श्रीराम मारुती संस्थान - सुनील भाऊ जगताप यांचे घर -रोहील पुरा -धनगर पुरा -गणपती चौक - गुजरी चौक -संताजी नगर - पलसिद्ध मठ -बस स्टॅन्ड संत रोहिदास नगर - महाराणा प्रताप नगर .खालच्या बस स्टॅन्ड येथून परत संत सावता महाराज मंदिर भोगावती नदी जवळ मिरवणूक संपन्न झाली , यावेळी ठिकठिकाणी घरासमोर आकर्षक रांगोळी काढलेल्या होत्या ठिकठिकाणी संत सावता महाराज मूर्तीचे पूजन करून दर्शन घेण्यात आले ` यावेळी गोपाल शिराळे यांनी सह पत्नी मूर्तीचे पूजन करून अभिवादन केले तसेच मिरवणुकीत सहभागी असणाऱ्या भाविकांसाठी चहापाण्याची व्यवस्था केली `

दि 4 डिसेंबर पासून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ह.भ.प.श्री भागवताचार्य एकनाथ महाराज इंगळे (पिंप्री माळी) यांचे मार्गदर्शनाखाली होणार आहे. संत शिरोमणी सांवता महाराज पावुका दर्शन दि. ०५/१२/२०२५ शुक्रवार सकाळी १० ते ४ पर्यंत.

संत सांवता महाराज वंशज ह.भ.प. रविकांत महाराज वसेकर (श्री क्षेत्र अरण) जि. सोलापूर व शिवाचार्य रत्न सिध्दलिंग शिवाचार्य, मठाधिपती सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते दि 5 डिसेंबर रोजी प्राणप्रतिष्ठा व कलशरोहन सोहळा साजरा होणार आहे.

## वाळू वाहतुक करणारे टिप्पर व ट्रॅक्टर पकडले; महसूल विभागाची कारवाई

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ सचिन खंडारे**



**बुलढाणा :** देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुनाराजा शिवार आणि सिनगाव जहागीर पांगरी मार्गावर अवैध रेतीचे टिप्पर सह ट्रॅक्टर जप्त करण्यात आले. महसूल विभागाच्या अवैध वाळू प्रतिबंधक पथकामार्फत गत आठवड्यात करण्यात आलेल्या कारवाईने वाळू चोरीवर काही प्रमाणात जरब बसला आहे. दोन्ही वाहना वर दंडात्मक कारवाई सुरू आहे.

महसूल विभागाचे वाळू प्रतिबंधक पथक पेट्रोलिंग करत असताना २८ रोजी रात्री मौजे मेहुणा राजा येथे पुणेरी हॉटेलचे समोर अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर आढळले .सदर ट्रॅक्टर जप्ती पंचनामा करून पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथे अटकवून ठेवण्यात आले सदर कार्यवाही मंडळ अधिकारी श्री विजय हिरवे व ग्राम महसूल अधिकारी सुमित जाधव यांनी केली.तर ३ डिसेंबर रोजी सकाळी दोन वाजता मौजे पांगरी येथे सीनगाव पांगरी रस्त्यावर अवैध रेती वाहतूक करणारे एक टिप्पर पकडण्यात आले.सदर टिप्पर जप्त करून पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथे अटकाव करण्यात आले. सदर कार्यवाहीत तहसीलदार वैशाली डोंगरजाळ,मंडळ अधिकारी विजय हिरवे, ग्राम महसूल अधिकारी संजय हंडे ,महसूल सेवक कविता शिरसाट यांच्या पथकाने केली. टिप्पर मालक महेश काकड राहणार गारगुंडी हे असून टिप्पर चालक प्रथमेश बोरकर असल्याची माहिती महसूल विभागाने दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद असून सदर टिप्पर मध्ये अंदाजे चार ब्रास रेती आढळली.

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने भक्ती भावाने श्री दत्त जयंती साजरी

## खिचडी प्रसादाची २५ वर्षाची परंपरा -- देविदास शर्मा

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ सचिन खंडारे**



**बुलढाणा :** खामगाव स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा दिं ४-१२-२०२५ गुरूवार रोजी मंडळाचे एकनिष्ठ सदस्य विनोद सुकाळे यांच्या घरी संध्याकाळी ६ वा श्री दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर असणारे मंडळाचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्ना भाऊ शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २५ वर्षा पासून अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम निस्वार्थ अखंडपणे सुरू आहेत संध्या ५ वा श्री सदगुरू एकनाथ महाराज व श्री दत्त भगवान .यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विधिवत पुजन करण्यात आले त्यानंतर भजन. नामस्मरण. सदगुरू स्तोत्र चे पठण महाआरती करून महाप्रसाद ( खिचडी ) वाटप करण्यात आले या प्रसंगी विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे .अरूण कडवकर,सुशिला आवलकर. शकुंतला ढवळे,जयश्री झापर्डे.जया सुकाळे,बेबी आवलकर.उज्वल सुकाळे.छकुली सुकाळे.मनमितकौर चव्हाण.



बुंदेले ताई व मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते मंडळाच्या वतीने वृक्षारोपण.रक्तदान. गोरगरीबांना भोजन वाटप. ब्लॅंकेट वाटप. पक्ष्यांच्या करीता पाणी पात्र वाटप असे अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम वर्ष भर राबविल्या जातात या सर्व उपक्रमाची दखल घेत या वर्षी मंडळाचे सर्वेसर्वा देविदास शर्मा यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कारा ने सम्मानित करण्यात आले आहे अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

## थोडक्यात

### एससी एसटी अत्याचारातील मृत व्यक्तीच्या वारसाला 90 दिवसातच सरकारी नोकरी

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** राज्यात अनुसूचित जाती जमाती वरील अत्याचाराच्या प्रकरणात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे अत्याचारास प्रतिबंध अधिनियम 1989 अंतर्गत खून किंवा अत्याचारामुळे झालेल्या मृत्यू प्रकरणांमध्ये दिवंगत व्यक्तीच्या एका वारसाला नव्वद दिवसाच्या आत गट क किंवा गट ड संवर्गातील शासकीय/निमशासकीय नोकरी देण्याची कार्यपद्धती शासनाने निश्चित केली आहे. तब्बल नव वर्ष प्रलंबित 889 खून प्रकरणात या निर्णयामुळे नोकरीचा मार्ग मोकळा झाला आहे, अत्याचार प्रकरणात दोषारोपपत्र  दाखल झाल्यानंतर किंवा एफआयआर नोंदवून 90 दिवसाच्या आत वारसाला नोकरी देणे अनिवार्य आहे विशेष म्हणजे या प्रकरणात न्यायालयाचा कोणताही निकाल लागला तरी दिलेली नोकरी रद्द होणार नाही, जुलै 2025 पर्यंत एकूण 933 प्रकरणे मृत्यूची आहेत त्यापैकी 44 प्रकरण वगळता 889 प्रकरणे नोकरी देण्यासाठी प्रलंबित आहेत त्यापैकी अनुसूचित जातीचे 738 आणि अनुसूचित जमातीचे 151 प्रकरणे असून या प्रकरणात ही कार्यपद्धती लागू झाली आहे. नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीसने सातत्याने मंत्रालय स्तरावर तसेच देशपातळीवर विविध प्रकारच्या कार्यशाळा, धरणे, मोर्चे, आंदोलने पोस्टकार्ड कॅम्पियन आदी माध्यमातून पाठपुरावा केला होता. एनडिएमजे चे राज्य महासचीव एड.डॉ.केवल ऊके यांच्या मार्गदर्शनाखाली  वैभव गीते यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे त्यांच्या समवेत पी.एस. खंदारे शिवराम कांबळे, पंचशीला कुंभारकर, दिलीप आदमने, अजिनाथ राऊत, जगदीप दिपके  व एनडीएमजेचे शेकडो कार्यकर्ते विविध मार्गाने प्रयत्न करत होते बुलढाणा जिल्ह्यातील 18 खून प्रकरणांमध्ये शासकीय नोकरी देण्याचा मार्ग मोकळा झाला असून मयत कुटुंबातील वारसांनी तातडीने कागदपत्राची पूर्तता करावी व या ऐतिहासिक निर्णयाच्या संधीचा लाभ घेण्याच्या आव्हान सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सहाय्यक आयुक्त  यांनी केले आहे, काही तांत्रिक अडचणी आल्यास बुलढाणा जिल्ह्यातील पीडित व्यक्तींनी पी.एस.खंदारे मोबाईल नंबर8007468150 संपर्क साधावा असे आवाहन एनडीएमजे च्या वतीने प्रा.दिलीप मोरे9850378022 भारत गवई8605082313प्रशांत झिने9623841020दत्ताभाऊ सिरसाठ9637823383सतिश पैठणे9970220075 रसुल खान, प्रेमानंद सरकटे,एड.रविंद्र एडके
आदींनी केले आहे

### 13 वर्षीय अल्पवयीन मुलीवर 55 वर्षीय नराधमाकडून अत्याचार

भारत संग्राम | प्रतिनिधी

**नाशिक :** जिल्ह्यातील मालेगाव येथे एक अत्यंत धक्कादायक आणि निंदनीय घटना समोर आली आहे. मालेगाव येथील एका 13 वर्षीय अल्पवयीन व मतिमंद मुलीवर एका 55 वर्षीय नराधमाने अत्याचार केल्याची घटना उघडकीस आल्याने मालेगाव पुन्हा एकदा हादरले आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. संशयित आरोपी दीपक धनराज छाजेड याने पीडित अल्पवयीन मुलीला फूस लावून, तिला आपल्या स्कुटीवर बसवून एका निर्जन व पडीत जागेवर नेले आणि तेथे तिच्यावर अत्याचार केला. या गंभीर प्रकारानंतर तात्काळ पोलिस ठाण्यात धाव घेण्यात आली आणि आरोपीविरोधात अत्याचार तसेच पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास करत आरोपीला ताब्यात घेतले. या प्रकरणी त्याची न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी झाली. न्यायालयाने संशयित आरोपी दीपक छाजेड याला पुढील तपासासाठी दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. मालेगाव तालुक्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, 'मालेगावात काय चाललंय?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील डोंगराळे येथील साडेतीन वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असतानाच, त्यानंतर शहर व तालुका भागात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या ओळीने आणखी पाच घटना घडल्या आहेत. यामुळे अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या घटनांच्या मालिकेत, 16 नोव्हेंबर रोजी डोंगराळे येथील चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्येच्या प्रकरणी विजय खैरनार याला अटक करण्यात आली आणि तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या प्रकारानंतर जनप्रक्षोभ उसळला असताना, शहरातील कलेक्टर पट्टा भागात एका 55 वर्षीय व्यावसायिकाने अल्पवयीन मतिमंद मुलीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. मुलीची आई या व्यावसायिकाच्या घरी घरकाम करत असताना, त्याने आईसोबत आलेल्या मुलीस फूस लावून निर्जनस्थळी नेत तिच्यावर अत्याचार केल्याचा संशय आहे. या व्यावसायिकालाही तात्काळ अटक करण्यात आली आहे.

### स्थानिक निवडणुकीच्या धामधुमीत मतदारयादीत घोळ!

भारत संग्राम | प्रतिनिधी

**ठाणे :** सध्या महाराष्ट्रात निवडणुकीचे वातावरण असून स्थानिक निवडणुकांचे वारे वाहत असतानाच मतदार यादीत घोळ असल्याचे समोर येत आहे. काही ठिकाणी दुबार तिबार मतदारांची नोंदणी झालेली आहे, तर काही मतदारांचे पत्तेच बदलले आहेत. आता तर ठाण्यातील माजी नगरसेवकाचेच नाव मतदार यादीतून वगळण्यात आल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ठाणे शहरातील माजी नगरसेवक सुधीर भगत यांचे नाव नगरपालिका निवडणुकांसाठी अंतिम झालेल्या यादीतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे भगत यांनी निवडणूक आयोगाकडे धाव घेत तक्रार दाखल केली होती. यात गेल्या वर्षीच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आपण येथील प्रभागातून मतदारसंघातून मतदानाचा हक्क बजावल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंत्यार अनावधानाने सुधीर भगत यांचे नाव वगळण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाने मान्य केले आहे.

# अखेर साईबाबाच सुधीर दळवींच्या पाठीशी: संस्थानाची 11 लाखांची मदत

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईतील लोकप्रिय आणि ज्येष्ठ अभिनेते सुधीर दळवी यांची प्रकृती सध्या चिंताजनक अवस्थेत असून त्यांच्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून उपचार सुरू आहेत. शिर्डी के साईं बाबा, या 1977 मध्ये आलेल्या चित्रपटामुळे ते घराघरात पोहोचले आणि त्यांच्या चेहऱ्यावर तत्कालीन काळात भक्तांचा अपार विश्वासही बसला. आजही चाहत्यांच्या मनात ते साईबाबाच आहेत. मात्र आता हेच साईबाबा साकारणारे अभिनेते जीवघेण्या संसर्गाशी झुंजत असून त्यांना उपचारांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदतीची गरज भासू लागली आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी मागील काही दिवसांत परिस्थितीची गंभीरता समजावून सांगत चाहत्यांना, तसेच चित्रपटसृष्टीतील लोकांना आर्थिक मदतीचे आवाहन केले होते.



या आवाहनानंतर अनेक ठिकाणांहून मदतीचे हात पुढे येत आहेत आणि यामध्ये सर्वांत महत्त्वाची मदत आता शिर्डी साईबाबा संस्थान करणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने श्री साईबाबा संस्थान ट्रस्टला सुधीर दळवी यांच्या उपचारांसाठी 11 लाख रुपये देण्याची परवानगी दिली आहे. ट्रस्टने ही मदत देण्यासाठी न्यायालयाकडे औपचारिक परवानगी मागितली होती, कारण न्यायालयाच्या मागील आदेशानुसार अशा खर्चासाठी मंजुरी घेणे गरजेचे आहे. न्यायालयाने या मागणीला हिरवा कंदील दाखवत निर्णय दिला. अभिनेत्यांच्या आरोग्यस्थितीचे दस्तऐवज, उपचारांचे बिल, सादर केलेल्या माहितीच्या आधारे न्यायालयाने असे म्हणणे स्पष्ट केले की, हे अभिनेते साईबाबांची भूमिका साकारून जनमानसात भक्तीचा संदेश पसरवण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. अशा व्यक्तीच्या उपचारांसाठी मदत दिली जाणे योग्यच आहे. न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना, साईबाबांनी लोकांच्या सेवेसाठी जीवन वेचले होते, त्यांची भूमिका साकारलेल्या कलाकाराला मदत करणे ही मानवतेचीच सेवा असल्याचे नमूद केले. सध्या सुधीर दळवी मुंबईतील लीलावती रुग्णालयात 8 ऑक्टोबरपासून दाखल आहेत. सेप्सिस या गंभीर संसर्गाने त्यांची तब्येत ढासळली आहे आणि दीर्घकाळ उपचारांची गरज आहे. त्यांच्या पत्नीने सांगितले की, दळवी आता अंथरुणाला खिळले आहेत आणि दोन केअरटेकर व फिजिओथेरपिस्टच्या मदतीने त्यांची काळजी घेतली जातेय. पूर्ण आरोग्य सुधारण्यास किमान एक वर्षाचा काळ लागू शकतो. कुटुंबाच्या मते, आतापर्यंत त्यांच्या उपचारांवर सुमारे 10 लाख रुपये खर्च झाले आणि त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे ढासळली आहे. म्हणूनच कुटुंबीयांनी 15 लाख रुपयांची मदत मागणी केली होती. त्यावेळी रिद्धिमा कपूर, अभिनयातील दिग्गज अभिनेता रणबीर कपूर यांची बहीण पुढे आल्या आणि मदतीचा हात दिला. त्यानंतर अनेक चाहत्यांनीही योगदान दिले. तरीही अजूनही उपचारासाठी अधिक पैशांची आवश्यकता असल्यामुळे ही न्यायालयीन प्रक्रिया राबवली गेली. न्यायालयात ट्रस्टच्या वकिलांनी युक्तिवाद करताना असेही नमूद केले की, सुधीर दळवी यांनी साईबाबांच्या भूमिकेमुळे संपूर्ण भारताच्या श्रद्धेला जोडले, तसेच टीव्ही मालिकांमध्येही त्यांच्या कामाची खूप प्रशंसा झाली आहे. त्यांनी रामानंद सागर यांच्या रामायण मालिकेत महर्षी वशिष्ठ, तसेच बुनियाद, भारत एक खोज, मिर्झा गालिब, चाणक्य, आणि जुनून या मालिकांमध्येही महत्त्वाच्या भूमिका केल्या. परंतु त्यांना खरी ओळख आणि जनमानसाचे प्रेम मिळाले ते साईबाबांच्या स्वरूपात. आज त्यांच्या त्या भूमिकेची आठवण करतच साईबाबांच्या ट्रस्टने त्यांना मदतीसाठी पुढाकार घेतलेला आहे. न्यायालयानेही ट्रस्टच्या या निर्णयाला अनुमती देताना, मानव कल्याणासाठी धर्मादाय कार्य करण्याचा अधिकार ट्रस्टला 2004 च्या कायद्यानुसार मिळालेला असल्याचा उल्लेख केला. सुधीर दळवी यांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत असलेली असली तरी, त्यांच्या मदतीला पुढे येणारे हात आणि मिळणारी आर्थिक साथ ही त्यांच्या कुटुंबासाठी आशेची नवी किरणे आहे. चाहत्यांनी आणि सिनेसृष्टीतील लोकांनी दाखवलेल्या प्रेमामुळे त्यांना मानसिक आधार मिळत आहे. ही रक्कम उपलब्ध झाल्याने त्यांच्यावर योग्य उपचार अखंड सुरू राहतील आणि ते पुन्हा बरे होतील, अशी सर्वांची इच्छा आहे.

## अतिवृष्टीच्या मदतीवरून राजकारण तापले:केंद्राला प्रस्तावच नाही

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने केंद्राकडे कोणताही आर्थिक मदतीचा प्रस्ताव पाठवलेला नाही, अशी माहिती कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंगळवारी लोकसभेत दिल्यानंतर या मुद्द्यावरून राजकारण तापले आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अतिवृष्टीमुळे 14 लाख हेक्टर शेती नष्ट झाल्याचे सांगितले होते. मात्र महाराष्ट्र सरकारने केंद्राला केवळ 1 लाख 10 हजार 309 हेक्टर शेती नष्ट झाल्याचे कळवले आहे. याच आकडेवारीतील मोठ्या विसंगतीवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे.

ओमराजे निंबाळकर म्हणाले, आधी गृहमंत्रालयाने कृषी मंत्रालयाने लिहून दिलं की अजून प्रस्ताव आलेला नाही. तुमच्या माध्यमातून बातम्या झाल्यानंतर कृषीमंत्री म्हणाले की राज्यकडून प्रस्ताव आलेला आहे. सर्वोच्च सभागृहात त्यांनी असे म्हटले आहे. हे खासदारांच्या विशेषाधिकारात येते, त्यामुळे लोकसभा अध्यक्षाकडे दाद मागणार आहे. मंत्री खोटे उत्तर देत असतील तर ते दुर्दैवी आहे. दुर्लक्ष झाले असेल तर कबूल करा ना. पण अशाप्रकारे राज्यातील सरकारला प्रोटेक्ट करत आहेत. आजपर्यंत कोणत्याही मंत्र्याने असे रेकॉर्डवर खोटे उत्तर दिलेले पाहिले नाही. प्रस्ताव केंद्राकडे येत नाही तर डबल इंजिनचा काय उपयोग? असा टोला ओमराजे निंबाळकर यांनी लगावला. पुढे बोलताना ओमराजे निंबाळकर म्हणाले, मुख्यमंत्री फोनवरुन सभा घेत होते, उपमुख्यमंत्री हेलिकॉप्टर मधून पळत पळत जात सभा घेत आहेत. मी माझे कर्तव्य पार पाडलेले आहे. उद्या किंवा परवा हक्कभंग दाखल करणार असल्याचे ओमराजे निंबाळकर म्हणाले. लोकसभेत दिले जाणारी उत्तरे खोटे ठरवली जाणार असेल तर दुर्दैवी आहे असेही ते म्हणाले. खोटं बोल पण रेटून बोल अशी त्यांची परिस्थिती असल्याचे म्हणत ओमराजे निंबाळकर यांनी राणा जगजितसिंह पाटील यांच्यावर टीका केली. डबल इंजिन सरकारचा काय उपयोग होतो आहे?

## अपघातात तिन युवकांचा मृत्यू !

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** देऊळगाव राजा तालुक्यात चिखली दे. राजा महामार्गांवर घडलेल्या दोन अपघात तिघे जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली, तिघांपैकी दोन जण घरातील कर्ते पुरुष असल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. धोत्रा नंदई गावाजवळील मोटारसायकल अपघातात दोघे आणि टाकरखेड भागीले शिवारातील कारच्या धडकेत एक पादचारी असे तिघां जणांचा मृत्यू झाला. 2 डिसेंबर रोजी सकाळी धोत्रा नंदई येथील मोटारसायकलचा अपघात टाकरखेड भागिले शिवारात खडकपूर्णा नदीच्या वळण रस्तावर



झाला अपघातात कारभारी तुळशीराम पैठणे (वय ४०) आणि कारभारी संपत बनसोडे (वय ४८) यांचा जागीच मृत्यू झाला. अचानक झालेल्या या दुघर्टनेने संपूर्ण धोत्रा नंदई गावावर शोककळा पसरली,

दुसऱ्या घटनेतपायी जाणारे ज्ञानेश्वर प्रकाश भागीले यांना ईस्टीका वाहन (क्र. MH-20-GC-9654) ने मागून जोरदार धडक दिली. हे वाहन दीपक दादाराव खार्डे (रा. मेव्हणा राजा) यांच्या ताब्यात असल्याचे फिर्यादी रविंद्र सुखदेव भागीले (वय 46 वर्षे) यांनी पोलिसात दिलेल्या तोंडी अहवालात नमूद केले आहे. यासंदर्भात सुधाकर संपत बनसोडे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात वाहना विरुद्ध गुन्हा नोंदविला तर रवींद्र सुखदेव भागिले यांच्या फिर्यादीवरून त्यांनी कार चालक दीपक खार्डे याच्या विरुद्ध निष्काळजीपणाने वाहन चालवून मृतकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला.

## महिला मतदान अधिकाऱ्यांनी बजावली चोख जबाबदारी

### निवडणूक निर्णय अधिकारी प्रा संजय खडसे यांच्याकडून कौतुक।

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** मा.राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेल्या वेळेनुसार दिनांक 2 डिसेंबर 2025 रोजी नगर परिषद निवडणूक मतदान यशस्वीरित्या पार पडले.

नगर परिषद सिंदखेड राजा निवडणुकीमध्ये मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदखेड राजा येथे आदर्श सखी मतदान केंद्र स्थापन करण्यात आले होते. सिंदखेडराजा नगर परिषद निवडणुकीमध्ये एकूण 21 मतदान केंद्रे होते, त्यामधील प्रभाग क्रमांक 7 मध्ये मतदान केंद्र क्रमांक 7/1 साठी




दिनांक 2 डिसेंबर 2025 रोजी होणाऱ्या मतदानासाठी आदर्श सखी मतदान केंद्र सज्ज करण्यात आले होते. हे आदर्श सखी मतदान केंद्र महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय सिंदखेड राजा येथे हे मतदान केंद्र होते, या मतदान केंद्रावर एकूण 315 स्त्री आणि 353 पुरुष असे मिळून एकूण 668 मतदारांची येथे नोंद होती, त्यापैकी एकूण 585 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, म्हणजेच या सखी मतदान केंद्रावर विक्रमी असे 87.57% मतदान यशस्वीरित्या पार पडले. विशेष बाब म्हणजे मतदान केंद्र क्रमांक 7/1 आणि 7/2 या दोन्ही केंद्रावर सायंकाळी 5 नंतर विक्रमी गर्दी ची रांग लागली होती, रात्री 8:30 वाजता मतदान प्रक्रिया पूर्ण झाली होती. या पथकामध्ये मतदान केंद्राध्यक्ष म्हणून सुरेखा रामराव बडे यांनी दिलेली जबाबदारी उत्तमपने पार पाडली, सोबतीला सुवर्णा त्र्यंबक चौरे,ज्योत्सना कैलासराव देशमुख,योगिता ब्रिजलाल राठोड यांनी मतदान अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. मतदान केंद्राध्यक्ष म्हणून मिळाली जबाबदारी पार पाडण्यासाठी सुरेखा रामराव बडे तसेच सर्व मतदान अधिकारी महिला यांची ही निवडणूकीची पहिलीच ड्युटी होती, त्यामुळे त्या सर्व जणी थोड्याशा गोंधळलेल्या अवस्थेत होत्या त्यावेळी त्यांना मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे सरांनी त्यांना महत्त्वाचे मार्गदर्शन करून त्यांचे मनोबल वाढवले आणि त्यांना तुम्ही ही जबाबदारी यशस्वी रित्या पार पाडचाल याचा विश्वास दाखवला, आणि घडले हे तसेच या सर्व महिला भगिनींनी त्यांना दिलेली कर्तव्य अगदी चोखपणे आणि यशस्वीरित्या आणि विक्रमी पद्धतीने 87.57% मतदान घेऊन दाखवले. या सखी मतदान केंद्राच्या सर्व टीमचे मा.निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे सरांनी कौतुक केले त्यावेळी शेवटी मतदान केंद्राध्यक्ष सुरेखा रामराव बडे यांनी प्रा खडसे सरांचे आभार मानले.

## शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या कन्येचा शाही विवाहसोहळा संपन्न

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या कन्या ऋणालीराजे भोसले यांचा शुभविवाह रविराज देशमुख यांच्याशी नुकताच सातारा येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. शेंद्रे, सातारा येथील अजिंक्यतारा साखर कारखाना परिसरात आयोजित केलेल्या या शाही विवाह सोहळ्यात रेड कार्पेट आणि शाही शामियानाची आकर्षक व्यवस्था करण्यात आली होती.

या आनंददायी कौटुंबिक सोहळ्यात शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी एक अत्यंत अभिनंदनीय पाऊल उचलून आपल्या सामाजिक बांधिलकीचे अनोखे दर्शन घडवले. त्यांनी कन्येच्या विवाहप्रसंगी लातूर जिल्ह्यातील ओल्या दुष्काळग्रस्तांसाठी 10 लाख रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. या प्रसंगी भोसले यांनी मुख्यमंत्र्यांना 10 लाख रुपयांचा धनादेश प्रदान केला. लग्नासारख्या सोहळ्याच्या माध्यमातून समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्याच्या या प्रयत्नाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

# महापालिका निवडणुकांची तयारी अंतिम टप्प्यात:15 डिसेंबरच्या आसपास तारखांची शक्यता

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या तयारीसंदर्भात आज राज्य निवडणूक आयोगाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत दुबार मतदारांच्या मुद्द्यावर विशेष चर्चा झाली असून 15 डिसेंबर 2025 च्या जवळपास निवडणुकांच्या तारखा घोषित होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दूरचित्र संवादाद्वारे झालेल्या बैठकीत सर्व महापालिका



आयुक्तांना महत्त्वपूर्ण निर्देश दिले. त्यांनी स्पष्ट केले की, प्रारूप मतदार याद्यांवरील हरकती व सूचनांची पडताळणी करून वेळेत निपटारा करावा आणि कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच, संभाव्य दुबार मतदारांचा काटेकोर शोध घेऊन त्यांची यादी संबंधित महानगरपालिकेने आपल्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी. आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, मतदार यादीत ज्या नावांसमोर 'दोन स्टार' (**) दर्शविण्यात आले आहेत, ते संभाव्य दुबार मतदार आहेत. अशा मतदारांनी आपण कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहोत, याबद्दल विहित नमुन्यात अर्ज भरून द्यावा. अर्ज भरल्यानंतर त्या मतदारास नमूद केलेले मतदान केंद्र वगळता अन्य कोणत्याही केंद्रावर मतदान करता येणार नाही. जर संभाव्य दुबार मतदाराने आवाहनाला प्रतिसाद दिला नाही, तर तो मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून 'इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत' विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. हमीपत्राबरोबरच त्याची काटेकोर ओळख पटल्यानंतरच त्याला मतदान करण्याची परवानगी दिली जाईल, असे वाघमारे यांनी स्पष्ट केले. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी जशीच्या तशी वापरली जाते, तिचे केवळ प्रभागनिहाय विभाजन केले जाते. त्यानुसार, आयोगाने 1 जुलै 2025 ही अधिसूचित दिनांक निश्चित करून, त्या तारखेला अस्तित्वात आलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या याद्या वापरण्याचा निर्णय घेतला आहे. प्रारूप मतदार याद्यांवर हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत 3 डिसेंबर 2025 पर्यंत होती. दाखल हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन 10 डिसेंबर 2025 रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करावयाच्या आहेत, त्यापूर्वी सर्व हरकती व सूचनांवर योग्य ती कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांना देण्यात आले आहेत.

## वाशिम जिल्ह्याचा ऐतिहासिक आवाज 'दै. भारत संग्राम'ला हवी आहे तुमच्यासारख्या

# जबाबदार प्रतिनिधींची साथ!




## तालुका प्रतिनिधी

## शहर प्रतिनिधी

## ग्रामीण वार्ताहर



वाशिम जिल्ह्याच्या मातीशी नाळ जोडलेली, अनेक पिढ्यांचा विश्वास असलेली आपली पत्रकारितेची परंपरा 'दै. भारत संग्राम' आता एका नव्या, भव्य स्वरूपात आपल्या भेटीला येत आहे. या दिवाळीत, आम्ही केवळबातम्या नाही, तर जिल्ह्याच्या विकासाचा आणि सन्मानाचा एक नवा अध्याय सुरू करत आहोत. आणि या मिशनमध्ये आम्हाला

# हवी आहे तुमची साथ!

## आमची नजर आहे तुमच्या गावावर, तुमच्या शहरावर!

आम्ही विशेषतः खालील तालुक्यांतील प्रमुख गावांमध्ये प्रतिनिधी नेमण्यास प्राधान्य देत आहोत. तुमच्या गावातूनच जिल्ह्याचा आवाज बुलंद करा!

| | |
|---|---|
| वाशिम तालुका | अनसिंग, काटा, जवळा, तोंडगाव, पार्डी टकमोर, राजगाव. |
| मंगरूळपीर तालुका | शेलूबाजार, आसेगाव, चांभई, कवठळ, धानोरा, पेडगाव. |
| मानोरा तालुका | पोहरादेवी, इंझोरी, गव्हा, कोंडोली, फुलउमरी, शेंदुर्जना. |
| मालेगाव तालुका | शिरपूर जैन, मेडशी, झोडगा, अमानी, पांगरी, जऊळका. |
| रिसोड तालुका | लोणी, केनवड, भर जहागीर, गोवर्धन, हराळ, नेतन्सा. |
| कारंजा लाड तालुका | कामरगाव, मनभा, पोहा, धानोरा, पिंपरी, बेबळा. |

(टीप: या व्यतिरिक्तही जिल्ह्यातील प्रत्येक गावातील इच्छुक व्यक्तींनी संपर्क साधावा.)

## एक फोन लावा आणि बदला तुमचे आयुष्य!

**डॉ. माधव हिवाळे**
मुख्य संपादक, वाशिम

या सुवर्णसंधीसाठी आजच थेट संपर्क साधा.
9765332897